# अहवाललेखन

# महात्मा गांधी जयंती

### नेवासा, २ ऑक्टोबर २०२४

नेवासा तालुक्यातील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती ग्रामीण मुलांचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, त्रिमूर्तीनगर, नेवासा फाटा येथे महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली त्यावेळी सरस्वती वंदनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानंतर महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला आजच्या कार्यक्रर्माचे अध्यक्ष प्राचार्य. साळवे सर यांनी हार घातला आणि नंतर प्रतिमे समोर दीप प्रज्वलन केले व कार्यकर्माची सुरुवात केली.

1. महाविद्यालयातील छात्राध्यापक बर्डे आनंद याने कार्यकर्माचे सूत्रसंचालन केले ढोकने वैभव तसेच इतर विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या जीवनकार्यावर भाषणे सादर केली. काही विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या विचारावर कविता सादर करून वातवरण अधिक प्रेरणादायी केले.

२. चरख्याचे प्रात्यक्षिक - गांधीजींचे स्वावलंबनाच्या विचाराचा प्रसार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी चरख्याच्या प्रतीकृतीचे प्रदर्शन केले आणि त्याविषयी माहिती दिली.

3. स्वच्छता शपथ व मोहीम - गांधी जयंती निमित्त स्वच्छता भारत अभियान अंतर्गत संपूर्ण महाविद्यालयात स्वच्छता मोहीम राबवली गेली सर्व छात्राध्यापकाने स्वच्छतेची शपथ घेतली

४. गांधी विचार प्रदर्शन - महाविद्यालयाच्या ग्रंथालयात गांधीजींच्या पुस्तकांचे व फोटोचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

५. उपस्थिती -सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी कार्यक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.

६ . निष्कर्ष - महात्मा गांधी जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवन कार्याची जाणीव झाली.

7 . प्राचार्यांचे भाषण - प्राचार्य साळवे सर यांनी गांधीजींच्या सत्य अहिंसा आणि आत्मशुद्धीच्या विचारावर भाषण केले त्यांनी गांधीजींच्या शिक्षणविषयी दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले भालेराव सुहास यांनी शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.



# लाल बहादूर शास्त्री जयंती

**नेवासा, २ ऑक्टोबर २०२४**

नेवासा तालुक्यातील त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती ग्रामीण मुलांचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, त्रिमूर्तीनगर, नेवासा फाटा येथे लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली .त्यावेळी सरस्वती वंदना आणि कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली आजच्या कार्यक्रमाच्या अध्यक्ष साळवे सर यांनी लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला हार घातला प्रतिमे समोर दीप प्रज्वलन केले व कार्यक्रमाची सुरुवात केली. महाविद्यालयातील छात्राध्यापक बर्डे आनंद याने आपल्या वकृत्व कौशल्याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले .

लाल बहादूर शास्त्री यांच्या जीवनशैलीचे ओळख ढोकणे वैभव करून दिली. सर्व भाषण करणाऱ्या छात्राध्यापकाच्या जीवनाचा परिचय झाला. यानंतर प्राचार्य साळवे सर यांनी त्यांच्या भाषणातून सर्व छात्राध्यापकांचे कौतुक केले त्यांचे सामाजिक कार्य सर्वांसमोर मांडले त्यानंतर महाविद्यालयातील छात्राध्यापक भालेराव सुहास याने आभार प्रदर्शन केले.





